**पोलीस अधीक्षक कार्यालय, पालघर.**
जिल्हा मुख्यालय, कोळगाव, पालघर
दुरध्वनी – ०२५२५ - २५११००
E-mail: - sp.palghar@mahapolice.gmail.com

**प्रेसनोट क्र. २९ दिनांक १७/०६/२०२४**

# अवैधरित्या दारुची वाहतुक करणाऱ्या आरोपीवर वाडा पोलीस ठाणे यांचेकडून कारवाई

दि.१३/०६/२०२४ रोजी सकाळी १०.०० ते रात्रौ २४.०० वाजेपावेतो श्री. बाळासाहेब पाटील, पोलीस अधीक्षक पालघर यांचे आदेशान्वये गुन्हेगारांवर वचन निर्माण करुन गुन्ह्यांना आळा घालणेकरीता सर्व प्रभारी अधिकारी यांना सुचना देऊन ऑल आऊट ऑपरेशनचे आयोजन करण्यात आले होते. सध्या शिक्षक व पदवीधर संघाचे निवडणुकीची आचारसंहिता सुरु असून सदर ऑल आऊट ऑपरेशनमध्ये पोलीस ठाणे हद्दितील अवैध धंद्यांवर जास्तीत जास्त कारवाई करणेबाबत सुचना दिल्या होत्या.

त्या अनुषंगाने वाडा पोलीस ठाणेतील अधिकारी/अंमलदार हे अवैध धंद्यावर कारवाई करणेकरीता पेट्रोलींग करत असताना हमरापुर गावच्या हद्दित आयशर टेम्पो क्र.**GJ-27-X-3986** यामध्ये अवैधरित्या दारुची वाहतुक व विक्री होत असलेबाबत गोपनिय माहीती प्राप्त झालेली होती. त्या माहीतीच्या आधारे श्री. दत्तात्रय किंद्रे, पोलीस निरीक्षक, वाडा पोलीस ठाणे यांनी दिलेल्या सुचनांप्रमाणे हमरापुर फाटा वाडा-मनोर रोड लगत असलेल्या किसमत ॲग्रो प्लास्ट कंपनी समोर संशयीतरित्या उभा असलेला आयशर टेम्पो मध्ये असलेल्या लोकांच्या हालाचालीवर लक्ष ठेवले असता बराच वेळ त्या वाहनामधुन कोणीही इसम बाहेर न आल्याने दबा धरुन बसलेल्या पोलीस अधिकारी अंमलदार यांनी आयशर टेम्पो क्र.**GJ-27-X-3986** या वर छापा टाकला असता सदर वाहनामध्ये कोणीही इसम मिळुन आला नाही. सदर वाहनाची तपासणी केली असता त्यामध्ये खालील वर्णनाचा मुद्देमाल मिळून आला.

१) १,२०९००/-रुपये किमतीचा ALL SEASON नावाचे एकुण ३१ बॉक्स. प्रत्येक बॉक्समध्ये १२ बॉटल.

२) ९३६००/-रु ROCKFORD CLASSIC नावाचे एकुण १३ बॉक्स. प्रत्येक बॉक्समध्ये १२ बॉटल.

३) २९,७६०/-रुपये किमतीचा BLENDERS PRIDE नावाचे एकुण ४ बॉक्स. प्रत्येक बॉक्समध्ये १२ बॉटल.

४) ५९,५२०/-रुपये किमतीचा SIGNATURE नावाचे एकुण ८ बॉक्स.प्रत्येक बॉक्समध्ये १२ बॉटल.

५) ३०,७२०/-रुपयेकिमतीचा CARLSBERG PREMIUM ELEPHANT STRONG नावाचे एकुण १६ बॉक्स. प्रत्येक बॉक्समध्ये २४ टिन.

६) २३,०४०/-रुपये किमतीचा MCDOWELLS N0 १ ORIGINAL नावाचे एकुण ६ बॉक्स. प्रत्येक बॉक्समध्ये ४८ बॉटल.

७) ११,५२०/-रुपये किमतीचा IMPERIAL BLUE नावाचे एकुण ३ बॉक्स.प्रत्येक बॉक्समध्ये ४८ बॉटल

८) १०,८००/- रुपये किमतीचा JOHNMARTIN PREMIUM WHISKY नावाचे एकुण ५ बॉक्स. प्रत्येक बॉक्स मध्ये ४८ बॉटल.

९) ३,६००/-रुपये किमतीचा ICE VODKA ORANGE नावाचे एकुण १ बॉक्स.प्रत्येक बॉक्समध्ये १२ बॉटल.

१०) ३,६००/-रुपयेकिमतीचा ICE VODKA GREEN APPLE नावाचे एकुण १ बॉक्स. प्रत्येक बॉक्स मध्ये १२ बॉटल.

११) ३,६००रुपये किमतीचा ICEVODKA MANGO नावाचे एकुण १ बॉक्स.प्रत्येक बॉक्समध्ये १२ बॉटल

१२) ३,६००/-रुपये किमतीचा TUBORG STRONG PREMIUM BEER TEEN नावाचेएकुण २ बॉक्स. प्रत्येक बॉक्स मध्ये २४ टिन.

१३) १२,२४०/-रुपयेकिमतीचा ROYALSTAG CLASSICSTAG नावाचेएकुण ३ बॉक्स.प्रत्येक बॉक्समध्ये ४८ बॉटल.

१४) १६,३२०/-रुपयेकिमतीचा ALL SEASON नावाचेएकुण ४ बॉक्स.प्रत्येक बॉक्समध्ये ४८ बॉटल

१५) ४७,५२०/-रुपये किमतीचा STRLING RESERVE नावाचे एकुण ११ बॉक्स. प्रत्येक बॉक्स मध्ये ४८ बॉटल.

१६) ४७,५२०/-रुपये किमतीचा ALL SEASON नावाचे एकुण ११ बॉक्स.प्रत्येक बॉक्समध्ये ४८ बॉटल

१७) ९,०००००/-रुपये किमंतीचा एक आयशर कंपनीचा विटकरी व पांढरा पट्टा असलेला टेम्पो क्रमांक जी.जे.२७ एक्स ३९८६. टेम्पोच्या दोन्ही बाजुने इग्रंजीमध्ये ओमकारगो मुव्हर्स असे लिहलेले.

असा **एकुण १४,१७,८६० रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.**

**वरील अनोळखी आरोपी यांचेविरुध्द वाडा पोलीस ठाणे येथे** ।।। २४३/२०२४ महाराष्ट्र दारुबंदी का.कलम-६५(अ) (ई) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून गुन्ह्याचा पुढील तपास हा पोउपनिरी/चंद्रकांत हाके, नेमणुक वाडा पोलीस ठाणे हे करीत आहेत.

सदरची कारवाई पोलीस अधीक्षक, पालघर श्री. बाळासाहेब पाटील, अपर पोलीस अधीक्षक, पालघर श्री. पंकज शिरसाट, श्री. गणपत पिंगळे, उपविभागीय पोलीस अधिकारी, जव्हार विभाग यांचे मार्गदर्शनाखाली श्री. दत्तात्रय किंद्रे, पोलीस निरीक्षक, पोलीस उप निरीक्षक चंद्रकांत हाके, विजय डाखोरे, मयुरेश अंबाजी, पोहवा/गुरुनाथ गोतारणे, पोअम./गजानन जाधव, पोअंम./चेतन सोनावणे, पोअम./भुषण खिल्लारे, पोअंम./संतोष वाकचौरे यांचे पथकाने केलेली आहे.